# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.07.2025** **वार- रविवार**

---

**३२ गाव**

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या नियोजनबद्ध विकासासाठी प्रत्येक गावाचा प्राथमिक नियोजन आराखडा करण्यात येणार असून या गावांमध्ये राज्यसरकारच्या निधीची वाट न पाहता नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले जाणार आहे. तसच या गावांसाठी अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीचे वर्गीकरण केले जाणार नाही, अशी माहिती पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली आहे. महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांसाठी राज्यसरकारने नेमलेल्या प्रतिनिधींची बैठक काल झाली. त्यावेळी ते बोलत होते.

**वारकरी कीर्तनकार**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे आणि राष्ट्रीय सरपंच संसद'  यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमानवाडी आळंदी इथ दोन दिवसीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे' चे उद्घाटन काल झालं. अध्यात्म आणि विज्ञानाचे एकत्रिकरण केल्यास भारताला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देता येऊ शकते.  ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांवर जेव्हा युवक चालेल तेव्हाच भारत विश्वगुरू बनेल. असे विचार माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी  या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले.

**एकादशी**

आषाढ महिन्यातील वद्य एकादशी उद्या आहे. त्या निमित्त आळंदीला यात्रा होते. आषाढ वारीसाठी पंढरपूरला गेलेले वारकरी यात्रा पूर्ण करण्यासाठी आळंदीची यात्रा करतात. माउलींची पालखी कालच आळंदीत परतली असून संत तुकाराम महाराजांची पालखी आज आळंदीत जावून उद्या देहूत परतणार आहे. माउलींच्या साडेसातशेव्या जयंती आणि तुकोबांच्या साडे तीनशेव्या वैकुंठ गमन वर्षानिमित्ताने अनेक वर्षांनी उभय संत भेटीचा योग यंदा विश्वस्तांच्या प्रयत्नातून आला आहे.

PCMC

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागील वर्षापासून मालमत्ता कराबरोबरच पाणीपट्टीची वसुली करण्याचा निर्णय घेतला असून  २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १५ कोटी ५३ लाख ११ हजार ७३० रुपयांची पाणीपट्टी महापालिकेने वसूल केली आहे. यामध्ये ऑनलाइन कर भरणा करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून ६ कोटी ५३ लाख ५ हजार १५९ रुपये जमा झाले आहेत.

पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीपट्टी ग्राहकांना लवकरच नादुरुस्त अथवा बंद असलेले पाणीपट्टी मीटर दुरुस्त करण्याबाबत नोटीस देण्यात येणार आहे. नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन पाणीपट्टी मीटर लवकरात लवकर दुरुस्त करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**परिचारिका आंदोलन**

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या विरोधात राज्यातील सुमारे ३० हजार परिचारिकांनी शुक्रवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. राज्य परिचारिका संघटना पुणे शाखेच्या अध्यक्षा आरिफा शेख, सचिव विनय देसाई यांच्या नेतृत्वाखाली ससून सर्वोपचार रुग्णालयातील ३५० हून अधिक परिचारिका कामबंद आंदोलनात सहभागी झाल्याने ससूनच्या रुग्णसेवेवर त्याचा परिणाम झाला आहे. यामुळे ससून रुग्णालयातील डॉक्टर, प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या कामावर परिणाम झाला असून प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियोजनासाठी धावपळ होत आहे.

रुग्णसेवेसाठी प्रशिक्षणार्थी परिचारिकांचे तात्पुरते साहाय्य घेतले जात असून त्यांची संख्या कमी पडत आहे.

**बँक राष्ट्रीयकरण दिवस**

बँक राष्ट्रीयकरण दिवसाच्या निमित्ताने बँक ऑफ़ इंडियाच्या वतीनं संपूर्ण देशभर किसान दिवस साजरा करण्यात येत असतो. त्यानिमित्ताने बँक ऑफ इंडिया, पुणे विभागीय कार्यालया तर्फे खेड शिवापूर येथील नक्षत्र हॉलमध्ये विविध उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला 700 हुन अधिक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमात बँकेकडून पुणे आणि सातारा जिल्ह्यातील शेतकरी आणि बचतगटांना एकूण 250 कोटी रुपयांचे कृषी कर्जवाटप करण्यात आले. तसेंच 22 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आल्याचे पत्र वाटप करण्यात आले.

**बाजार**

पावसाने काहीशी उसंत दिल्याने गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने शेवगा, घेवडा, मटार, फ्लॉवर, पावटा यांच्या भावात घसरण असून तर हिरवी मिरची महागली आहे .

पालेभाज्यांची आवकही वाढल्याने मेथी, कांदापात स्वस्त झाले.

हवेतील गारठा कमी झाल्याने फळ बाजारात मागणी वाढली असून भावात वाढ झाली.  फुल बाजारात आज आवक वाढली असली तरी फुलांना फारशी मागणी नसल्यानं  फुलांचे भाव उतरले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. आज किमान २४ पूर्णांक ४ तर कमाल ३० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**